# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय , सिंधुदुर्ग
मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.


वाचले :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५, कलम ३४
२) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा-१८९७
३) फौजदारी प्रक्रिया संहिता -१८६०
४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ११६.
४) केंद्र शासनाच्या गृह विभागाकडील आदेश No.40-3/2020-DM-I(A) , दिनांक १५.०४.२०२०. (Annexure 1)

क्र.साशा/कोरोना/प्रतिबंध/०४/२० दिनांक १५/०४/२०२०.

## आदेश

शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा-१८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून , खंड २,३ व ४ मधील तरतुदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

सदर कायदा आपल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी लागू करणेत येत असून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणी खोकताना / शिंकताना तोंडासमोर रुमाल / पेपर / Napkin याचा वापर करावा. तसेच सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये. सार्वजनिक थुंकल्याचे निदर्शनास आल्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११७ अन्वये रक्कम रु. १०००/- एवढा दंड आकारणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच केंद्र शासनाच्या गृह विभागाकडील आदेश No.40-3/2020-DM-I(A) , दिनाक १५.०४.२०२०. (Annexure 1) अन्वये दारू , गुटखा , तंबाखू यांच्या विक्रीवर बंदी घालणेत येत असून सदरची विक्री करताना निदर्शनास आल्यास संबधितावर सक्त कारवाई करणेत येईल.

तरी या आदेशावर तात्काळ कार्यवाही करणेत यावी व याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा.

( के. मंजूलक्ष्मी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
सिंधुदुर्ग .

प्रत आवश्यक कार्यवाही साठी.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प. सिंधुदुर्ग.
२) जिल्हा पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग.
३) जिल्हा प्रशासन अधिकारी , नगर पंचायत विभाग , सिंधुदुर्ग.
४) उपविभागीय अधिकारी महसूल सर्व.
५) तहसिलदार सर्व.
६) गटविकास अधिकारी सर्व.
७) मुख्याधिकारी (नगर परिषद/नगर पंचायत ) सर्व.
८) जिल्हा माहिती अधिकारी , सिंधुदुर्ग.